# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३८५/२०१०-११ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. राजकुमार रमेश कुंभार ,<br>मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. राजकुमार रमेश कुंभार, मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे यांजमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द दि. २०.१.२०११ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

अर्जदार तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. ४४ येथे ३ अश्वशक्ती शेतीपंपास वीज पुरवठ्यासाठी वि.प.ने दि. ५.३.२००७ ला दिलेले चलन रु. ३२६८/- दि. १०.४.२००७ रोजी पावती क्र. ०२९४१९६ नुसार भरले. त्याचा मंजुरी क्र. EE/SGL/R/CSS/१७३९/०६-०७ असा आहे. चलनाच्या एकूण रकमेमध्ये १.३% CSS रु. १६६८/-, S.D. रु. १५००/-, C.T. रु. १००/- अशी रक्कम भरली आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार मा. विद्युत नियामक आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत हे वीज वाहिनी उभी करावयाचे काम वि.प.च्या कंत्राटदाराकडून करुन घेतलेले आहे. अंदाजपत्रकाच्या एकूण १.३% रक्कम वि.प.तर्फे देखभाल खर्च करुन वाहिनी उभी केली आहे. ग्राहकास दि.११.१२.२००७ रोजी विद्युत पुरवठा मिळाला आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार मा. आयोगाच्या आदेश क्र. ३६/२००९ प्रमाणे जर सदरची योजना चुकीची असेल तर, वि.प.ने मंजूर केलेल्या अंदाजपत्रका एवढी रक्कम
ग्राहकास रोख व्याजासह परत मिळावी. मात्र वि.प.ने ग्राहकाबाबत मा. आयोगाच्या आदेशाचे/ निर्देशंचे पालन केलेले नाही व चुकीच्या सी.एस.एस. मध्ये वीज पुरवठा केला आहे हे दिसून आले तर हा. मा.आयोगाच्या आदेश विपरीत कृती असणार आहे. ग्राहकाने आपल्या तक्रारीत मा. आयोगाच्या केस क्र. ३६/२००९ मधील आदेशाचा संदर्भ दिला आहे. तसेच मा. आयोगाचे केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशाचा उल्लेख केला आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार क्र. ६७४ दि. ११.११.२०१० ला दाखल केली आहे, त्यामध्ये आदेश झाले नाहीत. ग्राहकाने तक्रारीत विनंती केली आहे की, १.३% CSS रु. १६६८/- रकमेप्रमाणे एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,२८,३१०/- असणार आहे. मा. आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ मधील आदेशानुसार विद्युत कायदा कलम ६२(६) नुसार व्याजासह एकरकमी बिलातून परतावा मिळावा. ही रक्कम संपूर्ण अदा होईपर्यंत वि.प.ने ग्राहकाकडून कोणतेही बील वसूल करु नये, दर तिमाही देय बिलातून ग्राहकाचे नांवे असणारे क्रेडिट वि.प.ने ग्राहकास कळवावे व कपॅसिटरचे रु. १००/- हे शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत असलेने ही रक्कम परत मिळावी.

वितरण कंपनीने नोटीस देवूनही मुदतीत दि.९.२.२०११ पर्यंत म्हणणे दिले नाही. प्रस्तुतची तक्रार सांगली येथे दि. ८.३.२०११ ठेवण्यातआली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. वि.प.ने लेखी अहवाल देण्यास मुदत मागितली ती फेटाळण्यात आली. ग्राहक प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले. श्री. खापरे यांनी कपॅसिटर टेस्टिंग फीचे रु. १००/- परत मिळावेत, तसेच CSS ही रक्कम शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विरुध्द ग्राहकाकडून भरुन घेतली आहे, अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,६६,६८०/- व्याजासह वीज बिलातून मिळावी अशी मागणी केली. वि.प.चे अधिकारी श्री. टिळक यांनी ग्राहकाने १.३% रक्कम भरल्याचे मान्य केले, परंतु ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी अंदाजपत्रकीय रक्कम १.६६ लाख म्हटले आहे ती रु. १.२८ लाख असू शकेल असे म्हणणे मांडले. दि. २४.३.२०११ ला परत मंचासमोर तक्रारीची सुनावणी घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधींना फोनवर सूचना दिली. वि.प.ने लेखी अहवाल दाखल केला. सुनावणीचे वेळी कागदपत्रे दाखल केली. ग्राहक प्रतिनिधी गैरहजर. त्यांनी मंचास दि. २८.३.२०११ च्या पत्रानुसार माहिती अधिकारात मिळालेली अंदाजपत्रकाबद्दलची माहिती सादर केली.

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी त्यांची तक्रार ठोसपणे मांडलेली नाही किंभवना ते संभ्रमावस्थेत आहेत असे दिसते कारण त्यांनी तक्रारीत असा उल्लेख केला आहे की, मा. राज्य आयोग आदेश क्र. ३६/२००९ प्रमाणे जर सदरची योजन चुकीची असेल तर वितरण कंपनीने मंजूर केलेल्याअंदाजपत्रका एवढी रक्कम ग्राहकास रोख व्याजासह परत मिळावी. ही योजना मा. आयोगाने मान्यता दिलेली असलेस ग्राहकाची कोणतीही तक्रार असणार नाही. ग्राहकाने अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,२८,३१०/- हि १.३% ची रक्कम रु. १,६६,६८०/- या वरुन काढलेली आहे आणि ती व्याजासह एकरकमी मिळावी हि मागणी केलेली आहे. वितरण कंपनी आयोगाचा मान ठेवते पण आयोगाचे आदेश जसे वितरण कंपनीवर बंधनकारक आहेत (आदेश पाळणे गरजेचे आहे किंवा ते कंपनीचे कर्तव्यच आहे) तसेच ग्राहकाचेसुध्दा कर्तव्य आहे. ग्राहकाने स्वखुशीने सदरची लाईन स्वतःच्या खर्चाने उभी करुन घेतलेली आहे. अर्ज देणेपासून काम पूर्ण होईपर्यंत कोठेही नाराजी व्यक्त केलेली नाही. ग्राहकाला वीज जोडणी दि. ११.१२.२००७ रोजी दिली आहे व ते सदर कामापोटी खर्च केलेली रक्कम द्यावी अशी मंचाकडे दि. २०.१.२०११ रोजी मागणी करीत आहेत. त्यामुळे तक्रारदाराने मागणी मुदतीत केली नसल्याने अंदाजपत्रकाची रक्कम मान्य करण्यात येवू नये ती फेटाळण्यात यावी. वि.प.चे अधिकारी श्री. टिळक यांनी आपल्या तोंडी युक्तीवादात मंचासमोर Contributory Service Scheme बाबतची तक्रार ठोस नाही, uncertain आहे. तक्रारदार ४ वर्षांनंतर परतावा मागत आहेत. दि. २०.५.२००८ च्या परिपत्रकानुसार परतावा द्यावा. ग्राहकाने स्वखुशीने सदरची लाईन स्वतःच्या खर्चाने उभी करुन घेतलेली आहे. ही बाब चुकीची असेल तर तक्रारदारास पैसे द्यावे असे म्हटले आहे. तक्रारदाराची मागणी फेटाळण्यात यावी असे म्हटले आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केलेली अंदाजपत्रकातील रक्कम रु. १,२८,३१०/- व्याजासह एकरकमी बिलातून परतावा मिळावा ही मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाची परताव्याची मागणी मुदतीत आहे काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

ग्राहकाने कपॅसिटर फी रु. १००/- व खर्च केलेल्या रकमेचा परतावा द्यावा याबद्दल वि.प.ने मंचासमोर कुठलाही खुलासा केलेला नाही. ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे कपॅसिटरचे रु. १००/- हे शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विपरीत असलेने ही रक्कम त्वरित ग्राहकास परत देणेबाबत वि.प.स आदेश करणे योग्य होईल. वि.प.ने ग्राहकास गट क्र. ४४ येथे ३ अश्वशक्ती शेतीपंपास अेजी ६६४ ( ग्राहक क्र. २७०४७०५२४२१६ ) नुसार कनेक्शन दिले आहे. ग्राहकाने चलन रु. ३२६८/- दि. १०.४.२००७ रोजी पावती क्र. ०२९४१९६ नुसार भरले. त्याची मंजुरी CSS/१७३९/०६-०७ दि. ५.३.२००७ नुसार झालेली आहे. ग्राहकाने १.३% CSS रु. १६६८/- भरले आहेत. ग्राहकाला वीज जोडणी दि. ११.१२.२००७ रोजी दिली आहे. वि.प.चे अधिकारी श्री. टिळक यांनी मंचासमोर CSS म्हणजे Contributory Service Scheme म्हणजे पर्यायाने ग्राहकाने करावयाचा खर्च असे सांगितले.

त्यानुसार ग्राहकाने रु. १६६८/- भरले हे वादातीत आहे. कपॅसिटर टेस्टिंग फी भरली हे वादातीत आहे. ग्राहकाने सुनावणी झाल्यानंतर पोष्टाने माहिती अधिकारात मिळालेली माहिती मंचासमोर सादर केली. मंचाने विचारणा केल्यामुळे ही माहिती दिली असावी. ग्राहकाने आपल्या तक्रारीत CSS योजनेनुसार रक्कम भरली असल्याचे म्हटले आहे. वि.प.ने दाखल केलेली कागदपत्रे पहातां, ORC योजने अंतर्गत साहित्याची पडताळणी करावी असे वि.प.ने म्हटले आहे. मंजुरी पत्रात CSS चा उल्लेख आहे. ग्राहकाने एकूण रु. ३२६८/- दि. १०.४.२००७ रोजी भरले आहेत. त्यामध्ये १.३% ची रक्कम रु. १६६८/- येते, त्याबद्दल वाद नाही. ग्राहकाने स्वखर्चाने विद्युत वाहिनी उभी करुन घेतली आहे व त्यानंतर त्यांना दि.११.१२.२००७ रोजी वीज जोडणी देण्यात आलेली आहे. वि.प.च्या अधिका-यांना सूचना देवूनही WCR मंचासमोर दाखल केले नाहीत. वि.प.ने लेखी अहवालात व मंचासमोर तोंडी कथनानुसार प्रामुख्याने तक्रार कालबाह्य आहे यावर भर दिला आहे, कारण दि. ११.१२.२००७ ला ग्राहकास वीज जोडणी दिली आहे व परताव्याची रक्कम दि. ११.१.२०११ रोजी मागत आहेत. ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील कलम ६.६ नुसार मंच २ वर्षाचे मुदतीत गा-हाण्याची दखल घेवू शकते असे स्पष्ट म्हटले आहे. या ठिकाणी मुदतीचा कायदा लागू होईल का ? असा प्रश्न उपस्थित होतो. पार्लमेंटने विद्युत कायदा २००३ साली मंजूर केला. त्यातील तरतुदीनुसार म. आयोगाची स्थापना होवून अधिनियम, सप्लाय कोड कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी मंजूर केले. प्रथम मा. आयोगाने केस क्र. ७०/२००५ मध्ये ८.९.२००६ ला शेड्यूल ऑफ चार्जेस मंजूर केले. त्यानंतर ते आदेश असतांनाही वि.प.चे अधिकारी ग्राहकांकडून ORC charges या ना त्या फॉर्ममध्ये वसूल करतात. त्यावरुन महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना यांनी १७.५.२००८ ला मा. आयोगाकडे पीटीशन दाखल केले. त्यामध्ये वि.प.ने ORC charges, मिटरची किंमत व इतर चार्जेस परत द्यावेत अशी मागणी केली. वि.प.ने दि. २०.५.२००८ ला मा. आयोगाचे दि. १६.२.२००८ चे आदेशानुसार स्पष्टीकरण किंवा मार्गदर्शक सूचना म्हणून परिपत्रक तयार केले, जेणेकरुन पूर्ण राज्यात एकाच प्रकारची पध्दती अवलंबली जावी, परंतु या सूचना -

Subject to final decision on proceeding pending before Hon'ble Supreme Court

अशा पध्दतीने दिल्या आहेत. वि.प.चे दि.२०.५.२००८ चे परिपत्रक क्र. २२१९७ मध्ये prospective non-DDF ग्राहकाने केलेला इन्फ्रास्ट्रक्चर खर्च विद्युत बिलातून द्यावा असे सुचविले आहे आणि मा. आयोगाची केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशानुसार पान १२ III

MERC either has to scrutinize details of all the consumers released during the period of ९th Sept. २००६ to २०th May २००८ for charges levied other than approved Schedule of Charges or publicly appeal either through news papers or electricity bills, asking the consumers to contact MSEDCL if such charges are levied on them during above period. Thereafter, MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the energy bills of the respective consumers.

This directive of refund of excesses recovered charges will not be applicable to the charges of which refund is stayed by Hon'ble Supreme Court in Civil Appeal No. २०३४० of २००७.

यामुळे वि.प ने सप्टेंबर २००६ ते मे २००८ या कालावधीत ग्राहकाकडून शेड्यूल ऑफ चार्जेस व्यतिरिक्त इतर चार्जेस घेतले असल्यास परत करावेत. त्यासाठी ग्राहकांच्या माहितीसाठी वर्तमानपत्रातून अथवा वीज बिलातून अपील करावे. तसेच ग्राहकाने कलम ४२(५) विद्युत कायदा २००३ व ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ नुसार स्थापन झालेल्या मंचाकडे तक्रार दाखल करावी. त्यामुळे वि.प.कडे चलन दिल्याच्या ५.३.२००७ तारखेनंतर किंवा वीज जोडणीची तारीख ११.१२.२००७ नंतर अर्जदाराने गा-हाणे दि. २०.१.२०११ ला दाखल केले तरीही कालबाह्य ठरत नाही असे मंचाचे मत झाले आहे, कारण मा. आयोगाची केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० चे आदेश वितरण कंपनीवर बंधनकारक आहेत. त्यामध्ये ग्राहकाच्या हक्काचे संरक्षण केले आहे.

प्रथमतः ग्राहक मा. आयोगाचे दि. १.९.२०१० च्या आदेशाचा हवाला घेवून व्याजाची मागणी करीत आहे. तसेच परतावा एकरकमी वीज बिलातून मिळावा अशी मागणी करीत आहे. मा. आयोगाच्या आदेशामध्ये

MSEDCL should adjust extra charges collected by it through energy bills of the respective consumers असे म्हटले आहे. ग्राहकाने आपले दि. ३०.३.२०१० चे बील दाखल केले त्या बिलाची रक्कम रु. ८६४/- व थकबाकी रु. ६५८७/- दाखविली आहे. तसेच दुसरी मागणी संपूर्ण रक्कम समायोजित होईपर्यंत वि.प.ने ग्राहकाकडून कोणतेही वीज बील भरुन घेवू नये. तसेच दर तिमाही देय बिलातून ग्राहकाचे नांवे असलेले क्रेडिट त्यांना कळवावे म्हणजेच वि.प.ने परताव्याची रक्कम बिलातून समायोजित करावी हे मान्य केले आहे, परंतु कुठल्याही परिस्थितीत परतावा एकरकमी रोखीने ग्राहकास मिळणार नाही. ग्राहकाने CSS योजनेखाली स्वतः खर्च करुन इन्फ्रास्ट्रक्चर उभे करुन वि.प.च्या अधिका-यांच्या देखरेखीखाली त्यांना दि. ११.१२.२००७ ला वीज जोडणी दिली आहे, म्हणजे ग्राहकाने विद्युत वाहिनी उभी करुन विद्युत पुरवठा मिळेपर्यंत खर्च केला आहे. त्या रकमेवर कलम ६२.६ नुसार वि.प.स व्याज देणे कायद्याने बंधनकारक आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे.

राहिला प्रश्न अंदाजपत्रकाची रक्कम रु. १,२८,३१०/- परत देण्याचे आदेश करणे किंवा ग्राहकाने प्रत्यक्ष केलेला खर्च परत करणे. त्यासाठी वि.प.ने WCR मंचासमोर हजर करणे आवश्यक होते अथवा लेखी अहवलात त्या रकमेचा ऊहापोह केलेला नाही. अनेकवेळा सूचना देवूनही वि.प.ने WCR मंचासमोर दाखल केला नाही. परंतु ग्राहकाने माहिती अधिकाराखील प्राप्त केलेल्या व मंचासमोर दाखल केलेल्या माहितीवरुन अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,२८,३००/- आहे. एवढे मात्र निश्चित की, प्रत्यक्ष केलेला खर्च हा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा कमी जास्त असू शकतो, त्यासाठी WCR वि.प.ने दाखल करणे आवश्यक होते.

वि.प.च्या अधिका-यांनी Technical sanction - Estimate under CSS त्यामध्ये एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,२८,३००/- दाखविली आहे. वि.प.च्या अधिका-यांनी आपल्या कामामध्ये Nature of material used for ORC work फिरोज इलेक्ट्रीकल्स, जत व कनिष्ठ अभियंता, उमदी यांची कांऊटर साईन असलेले आदेश फाईल कॉपीची झेरॉक्स प्रत मंचासमोर हजर केली आहे. दि. १६.४.२००७ चे material cost रु. ७४,७३५/- चे बील हजर केले आहे, कोटेशन व चलनाची झेरॉक्स प्रत जोडली आहे. ग्राहक प्रतिनिधी दि. २४.३.२०११ ला मंचासमोर उपस्थित नव्हते त्यामुळे त्यांचे याबाबत म्हणणे घेता आले नाही. तरी प्रथमदर्शनी वापरलेल्या मटेरियलची किंमत रु. ७४७३५/- आहे असे दिसते. त्यामुळे ग्राहकाने प्रत्यक्ष वीज वाहिनी उभी करण्यासाठी केलेला खर्च त्यास मिळण्याचा हक्क आहे व वितरण कंपनीची त्यांस परतावा करण्याची जबाबदारी आहे. अशा रकमेवर ग्राहकाने व्याजाची मागणी केली आहे ती मंजूर करणे योग्य आहे का ? हा प्रश्न आहे.

मा. आयोगाने आपल्या दि. १६.२.२००८ चे केस क्र. ५६/२००७ मधील आदेशामध्ये - Consumer should not be burdened with infrastructure cost which are the liability of Distribution Licensee हे तत्व उद्धृत केले आहे. मा. आयोगाने केस क्र. ५६/२००७ दि. १६.२.२००८ च्या आदेशामध्ये पान क्र. ६ वर असे निरीक्षण केले आहे की.

If the consumer dos not seek Dedicated Distribution Facility, the Licensee has to develop its own infrastructure to give electric supply within the period stipulated in Section 43 of Electricity Act 2003 read with MERC ( Standards of Performance of Distribution Licensee,period for giving supply and determination of compensation ) Regulation 2005. In fact, the Licensee should take advance action to develop the distribution net work, based on the survey of grown pockets and demand projections so as to fulfill ' Universal Service Obligation ' as per the spirit envisaged in the Electricity Act 2003 and the Regulations made there under.

त्यामुळे ग्राहकास WCR प्रमाणे होणा-या रकमेवर विद्युत पुरवठा झालेल्या तारखेपासून दि. ११.१२.२००७ पासून परतावा सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी १२% बँक रेटने अथवा त्यावेळी असलेल्या दरानुसार व्याज मिळण्याचा हक्क आहे. सदर रकमेचे समायोजन वीज बिलातून करण्यात यावे असे आदेश देणे योग्य होईल. या ठिकाणी मा. सुप्रीम कोर्टासमोर असलेल्या सिव्हील सूट क्र. २०३४०/०७ चा उल्लेख आहे व वरील परतावा हा मा.सुप्रीम कोर्ट व मा. विद्युत नियामक आयोगाकडे असलेल्या केसच्या अंतिम निर्णयास अनुसरुन देणेचा आहे असे वि.प.चे म्हणणे आहे. मा. आयोगाच्या केस क्र. ९३/२००८ मधील दि. १.९.२०१० च्या आदेशातील निरीक्षणानुसार वि.प.ने कार्यवाही करावी.

This directive of refund of excesses recovered charges will not be applicable to the charges of which refund is stayed by Hon'ble Supreme Court in Civil Appeal No. २०३४० of २००७.

कारण की यापूर्वी केस क्र. ५६/२००७ मध्ये दि. १६.२.२००८ च्या आदेशामध्ये मा. आयोगाने पान क्र. ७ वर पॅरा ३ मध्ये खालील प्रमाणे निरीक्षण केले आहे.

It will not be appropriate to direct refund under this order, as the Order dated August ३१, २००७ passed by the Hon'ble Supreme Court in Appeal No.२०३४० of २००७ is still in force as the term SLC which is subject matter of appeal has purportedly been charged by MSEDCL herein using the nomenclature of ORC in many cases although they both are and pertain to SLC. In view of the admittedly overlapping nature of these charges with Service Line Charges which is sub-judice before the Hon'ble Supreme Court, the Commission declines to order refund as stipulated under its Order dated May १७, २००७.

त्यामुळे CSS रकमेबाबत जर वि.प.ने मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान करुन त्यावर तहकुबी घेतली आहे हे स्पष्ट झाले तर ग्राहकास ती रक्कम, त्यावरील व्याज मिळणार नाही असे येथे नमूद करावेसे वाटते. वरील विवेचनावरुन मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येवून तक्रार मंजूर करण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) वितरण कंपनी कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास कॅपॅसिटर टेस्टिंग फी रु. १००/- त्वरित रोख परत द्यावेत.
३) वितरण कंपनीने ग्राहकास CSS योजनेखाली मंजूर झालेला विद्युत पुरवठा यासाठी प्रत्यक्ष केलेला खर्च रु. ७४७३५/- हा १२% व्याजासह वीज जोडणी तारखेपासून म्हणजे दि. ११.१२.२००७ पासून द्यावा. सदर रकमेचे समायोजन सुरु होईपर्यंत १२% व्याज द्यावे. वादातील रक्कम CSS योजनेतील परताव्याची रक्कम मा. सर्वोच्च न्यायालयापुढे वितरण कंपनीने सिव्हील अपील क्र. २०३४० /२००७ दाखल केलेल्या अपिलाचा व तहकुबीचा विषय असेल तर अशा रकमेच्या परताव्याचे काम तहकूब करावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**<u>ग्राहक तक्रार क्र. २७०/२०१०, २७१/२०१०, ३०७/२०१०</u>**

मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या आदेशाशी सहमत नसल्यामुळे श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव स्वतंत्र मत नोंदवित आहे.

**(अ) ग्राहक तक्रार क्र. २७१/२०१० (श्री. आनंदराव सिदू डबाणे, रा. कासेगांव, जि. सांगली )**

आदेशातील क्र. (३) नुसार ग्राहकास रु. १,६१,६००/- या रकमेवर १२% व्याज जोडणी दिल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. ८.८.२००८ पासून बिलातून परतावा सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी वितरण कंपनीने द्यावे यास माझी हरकत आहे.
कारणे -

१) सदरील ग्राहकास परताव्याची रक्कम ही वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ नुसार दिलेली आहे. औद्योगिक कनेक्शन हे नॉन डी.डी.एफ. या सदराखाली समजून परतावा मंजूर करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे आदेशातील क्र.३ नुसार वितरण कंपनीने ग्राहकास रु. १,६१,६००/- ही परताव्याची रक्कम त्यांच्या वीज बीलातून समायोजित करुन द्यावी.

सदर परतावा हा परिपत्रक दि. २०.५.२००८ नुसार मान्य केला असून तो दि. २०.५.२००८ नंतर देणेत येणा-या ( prospective ) वीज कनेक्शनसाठी लागू आहे.

(२) परिपत्रकाच्या तरतुदीनुसार खर्चावरील व्याज देता येणार नाही. व्याज देण्याबाबतची रक्कम व त्याचा कालावधी ठरविण्यास निश्चित आधार नाही.

सदर ग्राहकास विद्युत पुरवठा दि. ८.८.२००८ रोजी देण्यात आला. परिपत्रकाच्या तरतुदीनुसार ग्राहकास येणा-या प्रथम बिलापासून परतावा देणे योग्य होईल. म्हणजे औद्योगिक वापरासाठी मासिक बिलींग पध्दतीप्रमाणे परतावा चालू होणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. म्हणून वीज जोडणी नंतरच्या प्रत्येक बिलींग सायकल मधील वीज बिलाची ५०% रक्कम परताव्याच्या पहिल्या बिलातून एकदम समायोजित करावी, त्यासाठी व्याज व विलंब आकारणी करु नये. जर ग्राहकाने बीले भरली असल्यास परतावा सुरु होण्यापूर्वीच्या कालावधीसाठी भरलेल्या बिलाच्या ५०% रकमेवर १२% व्याज द्यावे. ५०% रकमेच्या परताव्याबाबतचे वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ लागू राहील जे परिपत्रक क्र.२२१९७ दि. २०.५.२००८ वर आधारीत आहे.

**(ब) ग्राहक तक्रार क्र. २७०/२०१० व ३०७/२०१०**

सदरील ग्राहक तक्रार क्र. २७०/२०१० मध्ये मे. धन आयुर्वेद ॲग्रो ॲग्रीकल्चरल्स मधील वीज जोडणी ही दि. १.२.२००८ व ग्राहक तक्रार क्र. ३०७/२०१० मे. सुर्या बायो फ्युएल मधील वीज जोडणी दि. ५.४.२००८ रोजी देण्यात आली आहे. त्यामुळे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ प्रमाणे नॉन-डी.डी.एफ. योजनेतून ग्राहकास बिलातून परतावा देता येणार नाही.

खालील मुद्दे विचारांत घेणे आवश्यक आहे.

1) MERC issued Schedule of Charges Order in case No. 70 of 2005 on date 8th Sept. 2006.

2) MSEDCL aggrieved by MERC' s Orders totally disallowing to levy of ServiceLine Charges (SLC), preferred an Appeal under Section 111 of the E.A. 2003 before the " Tribunal being Appeal No. 22/2007.

3) The Tribunal by its Order dtd. 14.5.2007 dismissed the Appeal and confirmed the Order of MERC.

4) MSEDCL filed an Civil Appeal No. 20340 of 2007 in Hon'ble Supreme Court against the legality, validity and properiety of the final judgement and order dtd. 14.5.2007 passd by the Appellate Tribunal of Electricity (the Tribunal ).

5) The civil appeal is filed on following grounds :

   i) because the orders of the Tribunal and MERC rendered the provision of Section 46 of the Act as well as Regulations 3.3 of the Suply Code which allows the Appellant (MSEDCL) to recover the amounts reasonably incurred by it for providing any electric line or electric plant for supplying electicity, redundant and otiose.
   ii) Because the Orders of Tribunal and MERC are contrary to Section 46 of the Act and Regulation 3.3 of the Supply Code.
   iii) MSEDCL was recovering SLC from consumers since from 1991. After supply Code came into force in 2005, the MSEDCL submitted Schedule of Charges including proposed SLC to MERC for approval. On all ocassions , the amount reovered as SLC was always reflected as consumer's contribution in the Balance Sheet of the MSEDCL at the stage of ARR.
   iv) Hon'ble Supreme Court issued Stay Order on 31.8.2007, the matter of refund till the matter comes up for hearing on 14.9.2007 Hon'ble Supreme Court continued the Stay untill further orders. Till this date, the stay is in existance.

6) Based on the Commission's order dtd. 16th February 2008, MSEDCL issued a Circular No. 22197 dated 20th May 2008 specifying " Guidelines for releasing new connections and augmentation". These guidelines were issued to follow uniform practice throughout the State for deciding applicability of Dedicated Distribution Facility (DDF) and to avoid hardship to prospective consumers and to remove the difficulties in releasing of new connections.

   The guidelines issued were subject to the final decision of the proceedings pending before the Hon. Supreme Court.

7) MSEDCL's Circular dated 20th May 2008 has a provision of refunding the infrastructure expenses incurred by the prospective Non-DDF

consumers for getting early connection through energy bill.



8) MERC in its order dated 1st Sept. 2010 in (caseNo. 93/2008) given directive 19 (iii) on page No. 12 that MSEDCL either has to scrutinize details of all the consumers released during the period of 9th Sept. 2006 to 20th May 2008 for charges levied other than approved Schedule of Chargs or publicly appel either through news papers or electricity bills asking the consumers to contact MSEDCL if such charges are levied on them during above period. Thereafter, MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the eneregy bills of respective consumers. If any consumer has any grievance regarding excess charges levied by MSEDCL and its refund, they may file the same before concerned CGRF established by MSEDCL under the provision of Section 42 (5) of E.A. 2003 read with the Maharashtra Electricity Regulatory Commission (Consumer Grievance Redressal Forum & Electricity Ombursman ) Regulations 2006.

The directives of refund of excess recovered charges will not be applicable to the charges of which refund is stayed by Hon'ble Supreme Court in Civil Appeal 20340 of 2007.

वरील मुद्दे लक्षात घेता ग्राहकास वीज पुरवठा करण्यासाठी येणारा खर्च (SLC - Service Line Charges ) परतावा देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. दि. २०.५.२००८ पर्यंत वितरण कंपनीने सर्व्हीस लाईन चार्जेस हे SLC, ORC, ORC (P), CSS, DS, DDF अशा वेगवेगळ्या सदराखाली रक्कम वसूल केल्याचे किंवा रक्कम ग्राहकाने खर्च केल्याचे मंचाकडे दाखल झालेल्या तक्रारीवरुन दिसते. या संदर्भात मा. विद्युत नियामक आयोगाचा दि. १८.२.२०११ चा केस क्र. १००/२०१० व केस क्र. १०१/२०१० आदेश विचारांत घेणे आवश्यक वाटते.

परताव्याबाबतच्या वरील दोन तक्रारी न्यायप्रविष्ट असल्यामुळे सद्यस्थितीत परताव्याबाबत आदेश देणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे.

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर